**तक्रार यूएलपी क्र १७९/२०१८.**
**नि.क्र.सी.१६ श्री सुभाष रामकृष्ण सुरवसे.**

शपथेवर कथन करतो की;

माझे नाव **श्री सुभाष रामकृष्ण सुरवसे** वय. ५२ वर्षे; रा.विडी घरकुल; हैद्राबाद रोड; सोलापूर.

**१.** मला या न्यायालयाचे साक्षी समन्स मिळाले. त्यानुसार आजरोजी मी साक्षीसाठी हजर आहे.

**<u>सरतपासणी सामनेवालेतर्फे श्री एस एस कालेकर विधिज्ञ यांचेतर्फे</u>**

**२.** आजरोजी मी सोलापूर महानगरपालिका लिपिक पदावर कार्यरत आहे. सन २०१३ मध्ये तुळजापूर चौत्रा नाका (जकात नाका) येथे कार्यरत होतो मी दि १०.०७.२०१३ रोजी माझी जकात नाक्यावर डयुटी होती त्याठिकाणी दोन ₹म होत्या पैकी एक जकात दुसरी एस्कॉर्टकरिता माझी डयुटी जकातकडे होती. एस्कॉर्ट कडे पंगूडवाले आणि सरवदे हे दोघे कार्यरत होते. सदर दिवशी मा आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांनी अचानकपणे भेट दिली. त्यांचेसोबत दुसरे कोण कर्मचारी होते ते मला आता आठवत नाही. सदर दिवशी मा आयुक्त पहिल्यांदा माझे ₹मला भेट दिली व त्यानंतर एस्कॉर्ट ₹मला गेले. मा आयुक्तांनी भेट दिल्यानंतर काय केले ते मला सांगता येणार नाही. हे मला माहित नाही की त्यांनी कोणाकडे काही विचारणा केली अगर कसे. सदर दिवशी अचानक भेट दिली म्हणून सहया करण्यास सांगितले त्याप्रमाणे आम्ही सहया केल्या.

**३.** आता मला कागदपत्र यादी नि क्र सी.१० सोबत अ क्र पान नं १६ दाखविण्यात आला तो दि १०.०७.२०१३ रोजीचा पंचनामा असून त्यावर माझी सही आहे. ते **<u>नि क्र सी. १७</u>** वरती आहे. सदरचा पंचनामा मी न वाचता सही केली आहे. आजरोजी मी पंचनामा वाचून बघितला परंतू सदर दिवशीच्या घटनेबददल मला काहीही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की दि १०.०७.२०१३ रोजी पंचनाम्यावरती माझी सही घेतली याबददल आजअखेर मी कुठेही तक्रार केली नाही.

**४.** न्यायालयासमोर खोटी साक्ष देणे हा गुन्हा याची मला पूर्ण कल्पना आहे. हे म्हणणे

खरे नाही की फौजदारी केसमध्ये माझा जबाब नोंदविण्यात आला. ज्यादिवशी मी सही केली ती पंचनाम्यावरती केल्याची त्या दिवशी माहित नव्हती. मला सदरची बाब फौजदार न्यायालय, सोलापूर यांचेकडून समन्स आल्यानंतर समजले. त्यानंतर सुध्दा मी पंचनाम्यावरती सही केल्याबाबत कोठेही तक्रार केले नाही. हे मला माहित नाही की, श्री.सरवदे यांनी माझेसमक्ष जकात नाक्यावर ₹ १६०००/- घेवून गेले होते असे श्री.सरवदे यांनी माझे समोर सांगितले. हे मला माहित नाही की त्या दिवशी श्री सरवदे यांनी दुरध्वनीव्दारे श्री बनसोडे यांना विचारले की ₹.१६०००/- घेतले असल्याचे माझेसमोर कबूल केले.

**<u>सरतपासणी पूर्ण.</u>**

**<u>उलटतपासणी तक्रारदारातर्फे श्री बी टी जाधव विधिज्ञ यांचेतर्फे,</u>**

**५.** हे म्हणणे खरे आहे की दि १०.०७.२०१३ रोजी मी दुस-या पाळीत कामात होतो. हे म्हणणे खरे आहे की मी जकात नाक्याकडे कामावती होतो. हे म्हणणे खरे आहे की जकात व एस्कॉर्ट यांचा एकमेकाशी संबंध नाही. मी तक्रारदार श्री बनसोडे यांना ओळखतो. हे मला आठवत नाही की, तक्रारदार जकातकडे की एस्कॉर्टकडे कामाला होते. हे म्हणणे खरे नाही की घटनेदिवशी तक्रारदार श्री बनसोडे हे जकात नाक्याकडे आले होते. तक्रारदार श्री बनसोडे यांचेबददल दि १०.०७.२०१३ रोजीची घटना घडली त्याबददल मला काहीही माहित नाही.

**६.** हे म्हणणे खरे आहे की व्यवस्थापनास मदत करण्याच्या उददेशाने मी न्यायालयासमोर साक्ष नोंदविण्याकरिता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी न्यायालयासमोर खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पूर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास काही नाही**

सही/–
(मु. रा. कुंभार)
सदस्य
औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.
दि.१६.१०.२०२५

*माकम*